<u>वाचले</u>- १) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २०१९, दि.१७/०१/२०१८.

२) जाहीरात क्र. २ब ,वायसीएमएच/०७/कावि/ ६६ /२०१८,दि. १८/०१/२०१८.

३) निवड समितीने शिफारस केलेली निवड यादी.

४) मा.आयुक्त यांचा दि.०१/०२/२०१८ मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
यशंवतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
क्र.वायसीएमएच/०७/कावि/११५ /२०१८
दि.- ०२/०२/२०१८.

**<u>विषय</u>- यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील एकत्रित मानधनावरील तात्पुरत्या स्वरुपात सहामहिनेकरीता वरीष्ठ निवासी / कनिष्ठ निवासी या पदावर नियुक्ती देणेबाबत....**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतरावचव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये रुग्णाचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेले **वरीष्ठ निवासी / कनिष्ठ निवासी** एकत्रित मानधनावर ६ महिनेकरीता भरणेकरीता उपरोक्त क्र.१अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी घेऊन क्र.२ अन्वये दैनिक वृत्तपत्रात जाहीरात देण्यातआलेलीहोती. वरीलपदांकरीताआलेले सर्व अर्ज छाननी करुन दि.२८/०१/२०१८ रोजी मुलाखती ठेवण्यात आल्या होत्या. मुलाखतीसाठी नेमणेत आलेल्या निवड समितीने निवडलेल्या उमेदवारांना एकत्रित मानधन तात्पुरत्या स्वरुपात सहा महिनेकरीता विविध पदांवर नियुक्ती देणेत आलेली आहे. सोबत प्रपत्र'**क**' मध्ये नेमणुक यादी जोडणेत आलेली आहे.

सबब,सदर उमेदवारांना नेमणुक देणेस मी आयुक्त पिंपरी चिचंवड महानगरपालिका, पिंपरी पुणे-१८ एकत्रीत मानधनावरतात्पुरत्या स्वरुपात सहा महिनेकरीता खालील अटी व शर्तीस अधीन राहुन मंजुरी देण्यात येत आहे. सदर कर्मचा-यांना देण्यात येणारे एकत्रित मानधन त्यांच्या नावापुढे दर्शविण्यात आलेले आहे.तसेच विविध पदांवर उपरोक्त क्र.४ अन्वये देणेत आलेली मुदत वाढ या आदेशाच्या तारखेपासुन रद्द करणेत येत आहे.

**<u>अटी व शर्ती</u>**

१) सदरचे पद निवासी स्वरूपाचे असल्याने संबंधित कनिष्ठ निवासी व वरीष्ठ निवासी यांना रूग्णालयामध्येच २४ तास वास्तव्य करावे लागेल.जे कनिष्ठ निवासी व वरीष्ठ निवासी रुग्णालयात राहत नाही असे निर्देशनात आलेस त्यांची सेवा त्वरीत समाप्त करणेत येईल.

२) कनिष्ठ निवासी व वरीष्ठ निवासी यांनी अपवादात्मक परिस्थितीत रूग्णालय सोडावयाचे असल्यास रूग्णालय प्रमुख यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

३) कनिष्ठ निवासी व वरीष्ठ निवासी यांनी रूग्णांशी सुसंवाद साधुन वैद्यकिय सेवेतील त्यांच्या तक्रारी, शंका, अडचणी दुर करणे. रुग्णांशी व्यवस्थित संभाषण न केलेबाबत तक्रारी आलेस आपली नेमणुक त्वरीत रद्द करणेत येईल.

४) नियुक्ती कालावधी संपल्यानंतर सेवा समाप्तीबाबत स्वतंत्र आदेश निर्गत केले जाणार नाहीत.प्रस्तृतची मुदत संपल्यानंतर त्याचा या पदावरील नेमणुक संदर्भात कोणत्याही प्रकराचा हक्क व दावा राहणार नाही.

५) नेमणुक कालावधीत नियुक्ती अधिका-यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल त्याप्रमाणे त्यांच्या सुचनांचे, निर्देशांचे वेळोवेळी पालन करावे लागेल. व वेळोवेळी वरीष्ठ सागंतील ती कामे करावी लागतील.

६) नेमणुक कालावधी संपण्यापुर्वी नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी एक महीना आगाऊ सुचना देऊन नेमणुक रद्द करुन घ्यावी तशी आगाऊ सुचना न दिल्यास त्यांच्याकडुन एक महीन्याचा मेहनताना वसुल करणेत येईल.

७) नियुक्ती कालावधीत कामकाज असमाधानकारक असल्याचे निर्देशनात आल्यास किंवा तक्रारी आल्यास नियुक्ती कालावधीच्या कोणत्याही स्तरावर त्यांची सेवा समाप्ती करण्याचे अधिकार मा.वैद्यकीय अधिक्षक यांना राहतील.

८) कनिष्ठ निवासी/वरीष्ठ निवासी यांनी रुग्णालय कामकाज करीत असताना रुग्णांचे केसपेपरवर लिहण्यात येणा-या नोट्स वर खाली स्वाक्षरी करुन स्वत: चे नाव टाकणे किंवा नावाचा शिक्का उमटवणे बंधनकारक राहील.

९)वरीष्ठ निवासी यांनी संबधीत शाखेतील सर्व रुग्णांची अॅडमिशन , इन्व्हेस्टिगेशन्स ऑपरेशन्स, डीस्चार्ज यामध्ये सुसत्रता आणणे,CPS Resident, Interns च्या कामावर देखरेख ठेवणे त्यांचे कामावर नियंत्रण ठेवणे, तज्ञ डॉक्टारांच्या सल्ल्यानुसार पेशंटला ट्रिटमेंट देणे व वरील सर्व कामात सुसुत्रता राखणे ही मुख्य कामे कनिष्ठ निवासीला करावी लागतील.

Scanned by CamScanner

१०)ज्या युनिट/ डिपार्टमेंट मध्ये कनिष्ठ निवासीचे Postingकेलेले असेल त्या युनिट /डिपार्टमेंट च्या प्रशाकिय व संपुर्ण रुग्णसेवेची व त्या अनुषंगाने उदभवणा-या सर्व कामांची (Patient Management) जबाबदारी Unit Head नंतर संबधीत कनिष्ठ निवासीवर राहील.

११)डिपार्टमेंट /युनिटमध्ये काम करीत असताना CPS Residents व Internes व मेडीकल स्टुटंड यांच्या Clinical Teaching व Lecture ची जबाबदारी Registrar वर पुर्णपणे राहील.

१२)नेमणुकीच्या संदर्भात रजिस्ट्रर / कनिष्ठ निवासी ने दिलेली कोणतीही माहीती खोटी आहे. असे निर्दशनात आल्यास व आपले कामकाज समाधानकारक नसलेस अथवा आपल्या सेवेची आवश्यकता नसलेस कोणतीही पुर्व सुचना न देता व तशी खात्री पटल्यास कोणत्याही प्रकारची चौकशी न करता अथवा कारणे दाखवा नोटीस व तत्सम नोटीस न बजावता महापालिका सेवेततुन कमी केले जाईल व त्याबाबत संबधीत कनिष्ठ निवासी/वरीष्ठ निवासीला कोर्टात दाद मागता ये़णार नाही.

१३) कनिष्ठ निवासी व वरीष्ठ निवासी यांना ६ महीन्यातुन फक्त ४ दिवस किरकोळ रजा मिळेल आणि ही किरकोळ रजा ज्या त्या महीन्यातच घ्यावी लागेल.अशी रजा संचयीत करुन एकत्रीतरित्या घेता येणार नाही. अन्य रजा (सार्वजनिक सुट्यासहीत) देय राहणार नाहीत. अन्य कारणास्तव गैरहजेरी विनावेतनी करण्यात येईल.अपवादात्मक परिस्थितीत ही रजा पुढच्या महीन्यात देणेबाबत विभाग प्रमुखांना अधिकार राहतील.

१४)कितीही दिवस एकत्रीत सेवा झाली तरी वेतनवाढ अथवा अन्य कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत. तसेच रजा प्रवास भत्ता सानुग्रह अनुदान व बोनस देय राहणार नाही.

१५)नेमणुक कालावधी संपल्यानंतर त्यांना या पदावरील नेमणुक संबधाने कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा राहणार नाही.अशी सेवा एकुण (Aggregate) कितीही झाली तरी उमेदवारास सेवेत नियमित स्वरुपाची नेमणुक आपोआप मिळणार नाही.

१६) मानधन कालावधीत दिड महिन्यासाठी १ या प्रमाणे एकुण ४ किरकोळ रजा देय राहतील.

१७)मानधनावरील नेमणुक पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरुपाची आहे.त्यामुळे कोणत्याही कायम पदी नेमणुकीच्या हक्क राहणार नाही.

१८) सदर कनिष्ठ निवासी, वरीष्ठ निवासी यांनी उपस्थितीसाठी बायोमेट्रीक दिवसातुन दोन वेळा करणेव मस्टरवरती सही करणे बंधनकारक राहील. ज्या दिवसाचा थंम्ब नसेल त्या दिवसाचा पगार अदा केला जाणार नाही.

१९)मानधनावरील नियुक्ती नोकरी नाही. त्यामुळे वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाह्य दबाव आणणार नाही. याबाबत १०० रु. च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

२०) आयकर नियमाप्रमाणे मानधनातुन TDS वजा करुन अंतिम रक्कम अदा करणेत येईल.

२१)कामावर वेळेवर हजर राहुन ओळखपत्र व गणवेश परिधान करणे. बंधनकराक राहील अन्यथा दंडात्मक कारवाई करणेत येईल. तसेच वॉर्ड इनचार्ज नियंत्रीत अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

२२) नेमणुक झालेल्या उमेदवारांनी रुजु होणेपुर्वी बँक ऑफ बडोदा ,पी.सी.एम.सी. मध्ये खाते उघडुन त्याचा क्रमांक व पॅन कार्डची झेरॉक्स संबधीत पगार लिपीकाकडे देणेत यावे.पुर्तता न केलेस पगारास विलंब झालेस त्यास रुग्णालयीन प्रशासन जबाबदार राहणार नाही.

२३) आदेशाच्या दिनांकापासुन ७ दिवसांच्या आत रुजु न झालेस सदरचा आदेश रद्द करण्यात येईल.

**प्रति,**
**डॉ.- ____________________**
**यशंवतराव चव्हाण स्मृति रुग्णालय,**
**पिंपरी – १८**

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

**प्रत,**
१) लेखा विभाग
२) सर्व्हर रुम
३) मेट्रन कार्यालय
४) राजीव गांधी जीवनदायी योजना
५) संबधीत पगार लिपीक

**वैद्यकिय अधिक्षक**
**यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
पिंपरी-४११०१८

D/Gaikwad sir/...

Scanned by CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
प्रपत्र- क
तात्पुरत्या स्वरुपाची एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीसाठी रजिस्ट्रार/हाऊसमन
नेमणूक यादी
नेमणुक कालावधी दि.०५/०२/२०१८ ते दि.०४/०८/२०१८ - ६महिने

पदनाम - वरीष्ठ निवासी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचा विभाग | प्रवर्ग | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. प्रिती राजपुरोहीत | गायनॅक | खुला | ५५,०००/- |
| २ | डॉ. काळे पुजा सुभाष | गायनॅक | खुला | ५०,०००/- |
| ३ | डॉ. शोहिब नजीम शेख | ऑर्थो | खुला | ५०,०००/- |
| ४ | डॉ.जगताप पुर्नवासु राजीव | ऑर्थो | खुला | ५५,०००/- |
| ५ | डॉ. दिपक कडु ठाकुर | भूलशास्त्र | खुला | ५०,०००/- |
| ६ | डॉ. प्रविण बजरंग चव्हाण | भूलशास्त्र | खुला | ५०,०००/- |

कनिष्ठ निवासी

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचा विभाग | प्रवर्ग | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. अमोल रमेश गोडसे | मेडीसीन | खुला | ४५,०००/- |
| २ | डॉ. अस्वले बालासाहेब मोहननाथ | मेडीसीन | खुला | ४५,०००/- |
| ३ | डॉ. शिंदे सिध्दनाथ गुंडुराव | मेडीसीन | खुला | ४५,०००/- |
| ४ | डॉ.फैय्याज आलम मोहंमद जावेद | मेडीसीन | खुला | ४५,०००/- |
| ५ | डॉ. सुजित कल्हापुरे | मेडीसीन | खुला | ४५,०००/- |
| ६ | डॉ. खंडात धनश्री संजयराव | मेडीसीन | खुला | ४५,०००/- |
| ७ | डॉ. सचिन अण्णासाहेब पाटील | मेडीसीन | खुला (एन.टी-डी ) | ४५,०००/- |
| ८ | डॉ. नेहा शिवाजीराव नागरगोजे | मेडीसीन | एन.टी.सी. | ४५,०००/- |
| ९ | डॉ. देवानंद भिकाजी तायडे | मेडीसीन | एस.सी. | ४५,०००/- |
| १० | डॉ. भावसार योगेश्वर सतीश | मेडीसीन | ओ.बी.सी. | ४५,०००/- |
| ११ | डॉ. प्रियंका अरुण भेलोंडे | मेडीसीन | ओ.बी.सी. | ४५,०००/- |
| १२ | डॉ. स्नेहल निवृत्ती खटके | गायनॅक | खुला | ५०,०००/- |
| १३ | डॉ. आशिष दिलीप बिरारीस | गायनॅक | खुला | ५०,०००/- |
| १४ | डॉ. जाधव अभिजीत सुधीर | गायनॅक | खुला | ५०,०००/- |
| १५ | डॉ. विद्या शिवाजीराव नाटकर | गायनॅक | खुला | ५०,०००/- |
| १६ | डॉ. गुंडाला वंदना सत्यनारायण | गायनॅक | खुला | ५०,०००/- |
| १७ | डॉ. देशमुख प्रशांत दिगंबर | गायनॅक | खुला | ५०,०००/- |
| १८ | डॉ. गुंजकर पुजा दिगंबर | गायनॅक | ओ.बी.सी. | ५०,०००/- |
| १९ | डॉ. सुचित्रा जंनपट्टी | गायनॅक | ओ.बी.सी. | ५०,०००/- |
| २० | डॉ.निमिष विद्युत शहा | सर्जरी | खुला | ४५,०००/- |
| २१ | डॉ. गायकवाड रणजित ज्ञानेश्वर | सर्जरी | खुला | ४५,०००/- |
| २२ | डॉ. सतीश प्रल्हादराव कावळे | बालरोग | खुला | ४५,०००/- |
| २३ | डॉ. मयुर मधुकर जावळे | नेत्ररोग | खुला | ५५,०००/- |
| २४ | डॉ. निकीता भागवत | दंतरोग | खुला | ४५,०००/- |
| २५ | डॉ. आकाश सोनवणे | दंतरोग | एस. सी. | ४५,०००/- |

क्र.वायसीएमएच/०७/कावि/६६/२०१८
दि.१८/०१/२०१८

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

1/2/2018